# पद्‌मश्री डॉ. प्रकाश आमटे











कांही दिवसांपूर्वी आम्ही १० अभियंते डॉ. प्रकाश आमटे यांच्या कर्तृत्वभूमी हेमलकसा भामरागडला जाऊन आलो. ऐकलेल्या गोष्टींपेक्षा ही चित्तथरारक बाबींचा तिथे अनुभव आला. आदीवासींना मुख्य प्रवाहात आणून, त्यांची पिळवणूक थांबावी आणि त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून द्यावी. या एकमेव ध्येयाने पछाडून डॉ. प्रकाश आमटे हे वडील कै. बाबा आमटे यांचे कार्य जोमाने पुढे नेत आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. मंदाकिनी आमटे व डॉक्टर, इंजिनियर मुले व सुना देखील त्यांचे संपूर्ण जीवन या कार्यास वाहून कार्यरत आहेत. त्याच्या वरील कर्तृत्वाने भारावून आम्ही हेमलकसा येथे काही मदत त्यांना केली.

इंजिनिअर्स फोरम तर्फे त्यांना काही आर्थिक मदत देऊन, खारीचा वाटा उचलावा या उद्देशाने त्यांना रॅमन मॅगसेसे अवार्ड मिळाल्यावर त्यांचा एक छोटेखानी स्वागत समारंभ लक्ष्मीनगर लॉन येथे आयोजित करण्यात आला व अध्यक्ष श्री सुरेश शिंदे ह्यांच्या हस्ते रुपये २५,०००/– ची त्यांच्या कोल बिरादरी प्रकल्पाला देणगी देण्यात आली.

कार्यक्रमातील इंजिनिअर्स बंधु भगिनींच्या औसुक्ययुक्त प्रश्नांना उत्तरे देतांना त्यांनी नक्षलग्रस्त समाज जीवनाच्या पार्श्वभूमीवर, हेमलकसा येथील आदीवासी पुनरूत्थान कार्याबद्दल, रोमांचित करणारे प्रसंग व अनुभव कथन केले.

डॉ. प्रकाश आमटे यांची भेट झाल्यावर व त्यांना ऐकल्यावर आम्ही सर्व अभियंते नतमस्तक झालो आहोत.

मोनॅको सरकारने डॉ. प्रकाश व मंदाकिनी आमटे यांचा उल्लेख "स्वाइट्झर कपल ऑफ इंडिया" असा त्यांच्या गौरवार्थ काढलेल्या पोस्टल तिकीटावर केला आहे.

नुकताच त्यांना गॉडफ्रे फिलीप्स लाईफ अचीव्हमेंट पुरस्कार प्राप्त झाला आहे. इंजिनिअर्स फोरम त्यांचे अभिवादन करतो व शुभेच्छा देतो.